# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट क्र-२०५ दिनांक-२८/०५/२०२४

## नायगाव पुर्व येथील ज्वेलर्समध्ये चोरी करणा-या महिला आरोपीत हिस अटक करुन गुन्हयातील १०० टक्के मुद्देमाल हस्तगत करण्यास नायगाव गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश.

नायगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०७/०४/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता सुमारास देवि इलेक्टॉनिक्स यशवंत अपार्टमेंट बिल्डींगमधील शॉप नं ०४ व ०५ मध्ये अरिहंत ज्वेलर्स चंद्रपाडा नायगांव पुर्व ता.वसई जि.पालघर येथुन फिर्यादी यांचे अरिहंत नावाचे ज्वेलर्सचे दुकानात एक वृध्द महिला वय अंदाजे ६० ते ७० वर्षे नाव व पत्ता माहीत नाही ही दुकानातील एकुण ७५,०००/- रु किंमतीचे सोन्याच्या अंगठया हया फिर्यादी यांचे संमतीशिवाय स्वताच्या फायदयाकरिता दुकानातुन चोरी करुन नेल्याबाबत नायगाव पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र. I १९६/२०२४ भां.द.वि कलम- ३७९ प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषगांने मा. वरिष्ठांच्या आदेशाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे वेगवेगळे पथके बनवुन सदर अनोळखी महिला हीचा शोध घेण्याकामी सदर घटनास्थळ व घटनास्थळाच्या आजुबाजुला तसेच नायगाव रेल्वे स्टेशन, अंधेरी रेल्वे स्टेशन तसेच आरोपीत हया राहत असलेल्या परिसरातील साधारण ९० ते १०० सीसीटीव्ही फुटेज व गुप्तबातमीव्दारामार्फत मिळाल्या माहितीच्या आधारे वर्सोवा अंधेरी पश्चिम मुंबई या परिसरातुन संशयीत माहिला नामे सुमित्रा अशोक वाघमारे,वय-५८ वर्षे,व्यवसाय-मच्छीविक्री, राहणार-रोहीदास नगर,अंबुजवाडी,मालवणी ०८, मालाड पुर्व, मुंबई हिस ताब्यात घेवुन त्यांच्याकडे गुन्हयाच्या अनुशंगाने कौशल्यपुर्ण चौकशीकरिता केली असता तिने सदर गुन्हयाची केल्याची कबुली दिल्याने सदर महिला आरोपीत हीस सदरच्या गुन्हयात अटक करण्यात आली असुन सदर गुन्हयामध्ये गुन्हयातील १०० टक्के मुद्देमाल हस्तगत करण्यात यश आले असुन सदर महिला आरोपीत हिच्यावर खालील पोलीस ठाण्याच्या अभिलेखावर गुन्हे दाखल आहे.

| अ.नं. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं व कलम |
|---|---|---|
| १. | कळवा पोलीस ठाणे | I ३१/२०१६ भादविस कलम ३७९,४२० प्रमाणे |

वरील कामगीरी श्रीमती पौणिमा चौगुले पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २ वसई, श्रीमती. पदमजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त वसई विभाग, नायगाव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रमेश भामे,पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. सागर टिळेकर, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे,सपोनि/गणेश केकान, सपोनि/रोशन देवरे, पो.अंम. सचिन मोहीते, सचिन खताळ, जयवंत खंडवी,अमर पवार, चेतन ठाकरे,अशोक पाटील, मसुब सिध्देश्वर क्षीरसागर यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.